## MAHARASHTRA ACT No. XXVI OF 1987

## THE PRESIDENCY SMALL CAUSE COURTS (MAHARASHTRA AMENDMENT) ACT, 1987

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक ३० जुलै १९८७, रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**डी. एन. चौधरी,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXVI OF 1987

## AN ACT FURTHER TO AMEND THE PRESIDENCY SMALL CAUSE COURTS ACT, 1882, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक ३ ऑगस्ट १९८७, रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

**सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.**

**'इलाखा शहर लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८२' महाराष्ट्र राज्याला लागू करताना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम**

१८८२ चा १५. ज्याअर्थी, 'इलाखा शहर लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८२' हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यामध्ये यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अडतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, 'इलाखा शहर लघुवाद न्यायालय (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९८७' असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सभापती, उप सभापती, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना बैठक भत्ता देणे.

सन १८८२ चा अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम १८ ची सुधारणा.

२. 'इलाखा शहर लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८२' (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्याच्या कलम १८ मध्ये, पहिल्या परंतुकानंतर पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल व ते दिनांक ३ जुलै १९७५ पासून समाविष्ट करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

"परंतु आणखी असे की, मुख्य न्यायाधीश उच्च न्यायालयाचे निदेशन व नियंत्रण यांस व त्यास लादणे योग्य वाटेल अशा शर्ती व निर्बंधांस अधीन राहून खंड (अ) व (क) अन्वये अशी परवानगी देण्याच्या प्रयोजनाकरिता, अर्जांवर विचार करणे व ते निकालात काढणे यासाठी निबंधकास अधिकार प्रदान करू शकेल आणि अशाप्रकारे अधिकार प्रदान करण्यात आल्यावर त्या योजनाकरिता निबंधक हा न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.".

विधिग्राह्यता.

३. मुख्य अधिनियमात किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात किंवा कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, निबंधकाने, त्याला मुख्य न्यायाधीशांनी प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून किंवा त्याने वापर करावा असे अभिप्रेत असलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक ३ जुलै १९७५ रोजी सुरू होणाऱ्या व दिनांक ३१ ऑगस्ट १९८४ रोजी संपणाऱ्या कालावधीत, मुख्य अधिनियमाचे कलम १८ याच्या खंड (अ) किंवा (क) अन्वये दावा दाखल करण्याकरिता दिलेली प्रत्येक परवानगी ही, जणू काही, अशी परवानगी ज्या ज्या वेळी दिली गेली त्या त्यावेळी, या अधिनियिमाद्वारे सुधारण्यात आल्याप्रमाणेच्या मुख्य अधिनियमाच्या कलम १८ च्या तरतुदी अंमलात असल्याप्रमाणे सक्षम अधिकारिता असणाऱ्या न्यायालयाकडून कायद्यानुसार व वैधरीत्या ती देण्यात आली असल्याचे व ती नेहमीकरिताच तशी देण्यात आली असल्याचे मानण्यात येईल ; आणि दावा दाखल करण्याकरिता अशी परवानगी देण्याची निबंधकाला अधिकारिता नव्हती, एवढ्याच केवळ कारणावरून अशा प्रकारे देण्यात आलेल्या परवानगीस कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणासमोर आक्षेप घेण्यात येणार नाही.

(यथार्थ अनुवाद)

**प. ग. पाटील,**
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.